# पोलिसांनी १५ लाख १८ हजारांचे ११० अँड्रॉईड मोबाईल केले हस्तगत; सायबर ठाण्याची कारवाई

गोदातीर दि 10/05/2023



**नांदेड-** जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणाहून व बाजारातून महागडे मोबाईल गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्याकरीता पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सायबरचे पोउपनि जी. बी. दळवी यांना आदेशीत केले होते. त्यानुसार सायबर सेलचे एक पथक व नांदेड जिल्ह्यातील सर्व उपविभागाचे पथक तयार करून मिसिंग मोबाईलचा शोध घेण्याची मोहीम राबविण्यात आली होती.

नांदेड येथील उपविभागातील पथकाने व स्थागुशाच्या पथकाने सायबर सेलचे तांत्रीक सहकार्याने जिल्ह्यातील गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध वेगवेगळया ठिकाणी जावून नांदेड जिल्ह्यातील एकूण ११० मोबाईल ज्यांची किंमत १५ लाख १८ हजार ५०० रूपयांचे हस्तगत केले आहेत. त्यांचे मंगळवारी एकत्रितरीत्या पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, डॉ. खंडेराय धरणे, गृह पोलीस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, सपोनि. शिवाजी लष्करे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोउपनि जी. बी. दळवी, सोपान थोरवे, पोलीस अंमलदार सुरेश वाघमारे, राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे, रेशमा पठाण, दाविद पिडगे, काशीनाथ कारखेडे, व्यंकटेश सांगळे, सायबर सेलचे सर्व अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली.

CMYK